पाक्षिक | शेतकरी संघटक | वर्ष ११ वे
वार्षिक वर्गणी रु. ३० | | अंक ७ वा
किंमत १ रुपया २५ पैसे | | ६ ऑगस्ट १९९४

# काँग्रेसला पर्याय नाही?

**– शरद जोशी**

आपल्या सरकारच्या कारकिर्दीची तीन वर्षे पुरी झाल्यानिमित्ताने पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी लाल किल्ल्याच्या समोरील मैदानावर एक पक्षीय मेळावा घेतला. पंतप्रधान एरव्ही मोठे सौजन्यशील आणि विनम्र व्यक्तिमत्व. पण त्यांनाही एका गोष्टीची बढाई मारल्याखेरीज राहवले नाही. बहुमताचा पाठिंबा नसलेले सरकार तीन वर्षे चालवले आणि आजमितीस त्यांचे सरकार बहुमतात आहे; पुरी पाच वर्षांची मुदत संपेपर्यंत त्याच्या अस्तित्वाला आज तरी काही धोका दिसत नाही. याचा त्यांनी मोठ्या अभिमानाने उल्लेख केला.

जनता पक्षाचे सरकार पूर्ण बहुमत घेऊन १९७७ साली सत्तेवर आले आणि अठरा महिन्यांत ते कोसळले. १९८९ साली जनता दलाच्या नावाखाली विरोधी पक्षांचे आघाडीचे सरकार पुन्हा एकदा सत्तेवर आले. जनता पक्षाच्या वेळी झालेल्या चुका यावेळी होऊ द्यायच्या नाहीत, कोणत्याही परिस्थितीत सरकार पडू द्यायचे नाही असा मनाशी निश्चय करत विश्वनाथ प्रताप सिंगांचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले आणि वर्षभराच्या आतच ते कोसळले.

राज्यपातळीवर, एवढेच काय, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, साखर कारखाने, सहकारी सोसायट्या या सगळ्या पातळ्यांवर येणारा अनुभव असा की, काँग्रेसवाले सत्ता सांभाळून ठेवतात आणि विरोधक एकमेकांत लाथाळी सुरू करून सगळेच आपटी खातात. केवळ विरोधी राजकीय पक्षांना याबाबत जबाबदार ठरवून दोष देता येणार नाही. अगदी शेतकरी संघटनेची कार्यकर्ते मंडळी ज्या काही थोड्या ठिकाणी सत्तेवर आली तेथे तेथे साखर कारखाने, जिल्हा बँका, कृषि उत्पन्न बाजार समित्या, पंचायत समिती इत्यादी संस्थांत पुष्कळदा असेच घडले. निवडणूक जिंकली पण सत्ता राखता आली नाही हा अनुभव काँग्रेसेतर सगळ्याच पक्षांचा आहे.

नरसिंहराव साहेबांच्या बढाईने काँग्रेसबाहेरील सर्वांनाच अंतर्मुख होऊन काही विचारचिंतन करण्याची संधी मिळाली आहे. या देशावर काँग्रेसचीच सत्ता राहणे अपरिहार्य आहे काय? काँग्रेसखेरीज देशाला पर्याय नाही काय? असे असेल तर त्याची कारणे काय? या सर्व पक्षांचा विचार आवश्यक आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी मागे एकदा जाहिररित्या म्हटल्याचे वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले होते की, काँग्रेसच्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांना सत्ता टिकवण्याची जेवढी जाणबूज असते तेवढी विरोधी पक्षाच्या पंतप्रधानांना देखील नसते. तात्पर्य, काँग्रेसला पर्याय नाही. त्यांनी कितीही गलथानपणे राज्य केले, भ्रष्टाचार केला, लूटमार केली तरी काँग्रेसच सत्तेवर राहणार. कारण, विरोधकांत सरकार चालवण्याची क्षमताच नाही. शरद पवारांच्या या मग्रुरीमागे काही तथ्य आहे काय?

योगायोग असा की याचवेळी मधु लिमये यांचे जनता पक्षाच्या राजवटीच्या अनुभवांसंबंधी एक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. जनता पक्षाच्या काळात समाजवादी आणि जनसंघवादी एकमेकांच्या कुरापती काढत राहिले, एवढेच नाहीतर, जाहिररित्या भांडत तंडत राहिले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दुहेरी निष्ठेचा मोठा कडाक्याचा वाद झाला आणि जनता पक्षाचे राज्य कोसळले. या सगळ्या प्रकरणात मधु लिमये याचा मोठा हात होता. किंबहुना, जनता पक्षाचे सरकार पाडण्याचा बहुतांश दोष मधु लिमये यांचाच आहे असे मानले जाई, त्यामुळे मधु लिमयेंचे आत्मकथन महत्त्वाचे आहे.

त्यांनी अर्थात, आपल्या अंगावरचा दोषारोप झटकून टाकला आहे. जनता पक्षाची स्थापनाच मुळी चुकीच्या पायावर झाली. इंदिरा गांधी आणि आणिबाणी यांच्या विषयीच्या दाहक अनुभवांमुळे विरोधक तात्पुरते एकत्र आले. त्यांत चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, जे. बी. कृपलानी यांचे व्यक्तिगत संघर्ष याचे मोठे चित्तवेधक वर्णन मधु लिमये यांनी केले आहे. ते स्वतः, जॉर्ज फर्नांडिस इत्यादिंनी सत्तेच्या अल्पकाळात उतामाताला येऊन काही मर्कटलीला केल्या त्याचे, अर्थात, तपशीलवार विश्लेषण लिमयांच्या पुस्तकात विस्ताराने नाही; पण त्यांचाही निष्कर्ष असा की, जे घडले ते अपरिहार्य होते. मधु लिमयांच्या या पुस्तकाच्या निमित्तानेही पुन्हा प्रश्न उभा राहतो की काँग्रेसला खरोखर पर्याय नाही काय?

१९८९-९० सालच्या विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या नेतृत्वाखालील जनता दलाच्या सत्ताग्रहणाच्या अनुभवाबद्दल अजून कोणी काही पुस्तक लिहिलेले नाही. त्या काळच्या घटना हताशपणे पाहण्याचे दुर्भाग्य ज्यांना लाभले त्या सगळ्यांची धारणा स्पष्ट आहे की, वैयक्तिक हेवेदावे, पंतप्रधानाच्या खुर्चीला क्षणमात्र का होईना आपले बूड एकदा टेकावे अशी अगदी किरकोळ कार्यकर्त्यांच्या मनातील वासना यामुळे जनता दलाचे सरकार कोसळले; मंडल, कमंडल केवळ निमित्तमात्र.

काँग्रेसच्या बाहेर जो जो म्हणून पडतो तो संपून जातो. नेताजी सुभाषचंद्र बोस काँग्रेसशी भांडून बाहेर पडले, फॉरवर्ड ब्लॉक नावाचा पक्ष त्यांनी स्थापन केला. नेताजींच्या आझाद हिंद फौजेच्या हौतात्म्याने ते अजरामर झाले पण, फॉरवर्ड ब्लॉक हा त्यांचा पक्ष बंगालच्या एका कोपऱ्यातून पुढेसुद्धा सरकला नाही. स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास लिहितांना नेताजींचा, झाला तर कोठे, अस्पष्ट उल्लेख होतो. एवढेच नाही तर, स्वातंत्र्याची चळवळ म्हणजे महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधींनी लहानपणी उभी केलेली वानरसेना असा अधिकृत काँग्रेसी इतिहास मांडला जातो.

१९४२ सालच्या आंदोलनानंतर क्रांतीकारी नेतृत्व म्हणून झळाळीने पुढे आले ते जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, अरूणा असफ अली, नरेंद्र देव यांचे. स्वातंत्र्य पाचदहा वर्षे उशीरा आले असते तर काँग्रेसचे प्रस्थापित नेतृत्व बाजूला फेकले गेले असते आणि नवे उमेदीचे नेतृत्व पुढे आले असते हे सर्वमान्य आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वर्षाभरात समाजवादी काँग्रेसपासून फुटून निघाले. त्यांनी वेगळा समाजवादी पक्ष स्थापन केला. जमाना समाजवादाचा होता, सर्वत्र समाजवादाचा उद्‌घोष चालू होता. दैदिप्यमान नेतृत्व उपलब्ध होते आणि तरीही १९५१ च्या सार्वत्रिक निवडणुकांपर्यंत म्हणजे अवघ्या तीन वर्षांत समाजवादी पक्षाचे तीनतेरा वाजले. काँग्रेसच्या बाहेर पडले तो संपतो. काँग्रेस पक्षातील कण्यांना सोन्याचे मोल आहे, विरोधातील बासमती कोंड्याच्या भावाने जातो, हा अनुभव अनेकांना आला. चंद्रशेखर, मोहन धारिया आणि कृष्णकांत हे तिघे काँग्रेसमध्ये तरुण तुर्क म्हणून गाजलेले काँग्रेसमध्ये राहिले असते तर नरसिंहराव, शंकरराव यांच्या कितीतरी वर असते. पण पक्ष सोडून बाहेर जाण्याची दुर्बुद्धी त्यांना झाली आणि ते संपले. यंशवंतराव चव्हाणांचा हाच अनुभव, विश्वनाथ प्रताप सिंगाचाही अनुभव तोच. शरद पवारांनाही हा अनुभव येऊन चुकला होता, पण गडी अस्सल बारामतीचा पैलवान! अंगाला तेल लावून विरोधकांच्या पेचातून सटकावे कसे यात पारंगत. '(काँग्रेस) संस्कृतीच्या गोष्टी बोलत ते अलगद परत गेले. पंतप्रधान होवोत, ना होवोत, त्या पक्षातील जेष्ठ नेत्यांत आज त्यांची गणना आहे. इंदिराजींच्या काळी महाराष्ट्रात पक्षाशी निष्ठा राखून राहिले एवढाच ज्यांचा गुण असे अनेक गणंग अजूनही त्यांच्यावर खार खाऊन आहेत. काँग्रेस पक्षाचा सत्तेवर एकाधिकार नाही, पण ताबा आहे याचा संबंध त्यांच्या शासनाच्या कार्यक्षमतेशी, गुणवत्तेशी किंवा स्वच्छतेशी आहे असे महान पक्षाभिमानी देखील म्हणणार नाहीत. नरसिंह रावांचे सरकार आल्यापासून शेअर घोटाळा, हर्षद मेहतांची सूटकेस, बोफोर्स प्रकरणातील माधव सिंह सोळंकीचा हस्तक्षेप अशी एकामागून एक प्रकरणे दर दोनचार महिन्यांनी निघतच असतात. काँग्रेस पक्षात सत्तेचा फायदा निग्रहाने न घेतलेले आणि सार्वजनिक आयुष्य वैराग्याने निभावून नेणारे, एक पैशाचाही गैरफायदा न घेतलेले असे कोणीही औषधापुरतेही शिल्लक नाही. जनता पक्ष किंवा जनता दल यांच्या राजवटीत मंत्रीमंडळात असे थोडेफारतरी लोक होते. आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचे विनंती अर्ज निःस्पृहपणे फेटाळून लावणारे मंत्रीही होते. त्यांच्यावर कार्यकर्ते भयानक नाराज झाले. काँग्रेस मंत्र्यांपेक्षाही स्वतःच्या पक्षाच्या निःस्पृह लोकांवर त्यांचा रोष अधिक. भ्रष्टाचारात लडबडलेली काँग्रेसची मंडळी सत्तेवर टिकून राहिली, भ्रष्टाचार धुवून काढण्याच्या निश्चयाने जे सत्तेवर आले ते टिकले नाहीत. काँग्रेसी भ्रष्टाचार विरोधकांच्या स्वच्छतेपेक्षा अंतोगत्वा लोकांना अधिक भावतो, याचा अर्थ काय?

काँग्रेस पक्षाकडे काही मोठा विचार, तत्त्वज्ञान किंवा कार्यक्रम होता असे नाही. याबाबतीत, म्हटले तर, विरोधकांची बाजूच सरस होती. जेथे जेथे म्हणून चूक करणे शक्य होते तेथे तेथे काँग्रेसने चुका केल्या. त्या काँग्रेसच्या चुकांमुळे काश्मिर प्रश्न रेंगाळतो आहे. काँग्रेसच्या चुकांमुळे चीनपुढे मानहानी स्वीकारावी लागली. काँग्रेसच्या चुकीमुळे जातीयवाद फोफावला, धर्मवाद माजला. स्वातंत्र्यानंतर सत्तेवर काँग्रेसचा अबाधित ताबा राहिल्याने देशात आज जे जे काही अमंगल, भयानक घडत आहे त्या सगळ्यांचीच जबाबदारी काँग्रेसच्याच शिरावर पडते आणि तरीही काँग्रेसचा सत्तेवर ताबा टिकून आहे.

अर्थकारणात तर काँग्रेसने घातलेला गोंधळ अवर्णनीय आहे. राजकुमारी अमृत कौर यांच्या संकोचाची मर्यादा तुटू नये म्हणून लोकसंख्या नियंत्रण आणि कुटुंब नियोजन स्वातंत्र्यानंतर कित्येकवर्षे दुर्लक्षित राहिले. अन्नधान्याचा तुटवडा दूर करण्यासाठी परदेशातून आयात करून साऱ्या शेतीक्षेत्राला संकटात टाकण्याचे काम काँग्रेसने आज या घटकेपर्यंत सातत्याने चालवले आहे. समाजवादी शब्दाचादेखील वल्लभभाई पटेल आदि अनेकांना राग होता. समाजवादी पक्ष काँग्रेसमधून फुटून निघाला ते काँग्रेसच्या समाजवादविरोधी भूमिकेमुळे. आवाडी काँग्रेसपर्यंत समाजवादी असा शब्द वापरण्याची हिंमत पंडित नेहरूंचीही झाली नव्हती; समाजवादी घाटणीची समाजव्यवस्था असा अवडंबरी प्रयोग करावा लागला होता. त्यानंतर, इंदिरा गांधींनी ४२ व्या घटना दुरूस्तीने सारे गणराज्य समाजवादी असल्याची तरतूद करून टाकली, एवढेच नव्हे तर, समाजवादी विचाराच्या निष्ठेची शपथ घेतल्याखेरीज कोणालाच निवडणूक लढवता येणार नाही असा कायदा केला. त्यानंतर, दोन दशके उलटण्याच्या आधी

त्याच काँग्रेस पक्षाने चुकतमाकत का होईना किंवा आपद्‌धर्म म्हणून का होईना, उलटे तोंड फिरवून खुल्या बाजारपेठ व्यवस्थेकडे वाटचाल चालू केली. चक्रवर्ती राज गोपालाचारींच्या स्वतंत्र पक्षाचा काँग्रेसने धुव्वा उडवला आणि त्याच स्वतंत्र पक्षाची विचारधारा आणि कार्यक्रम घेऊन काँग्रेस आज आगेकूच करत आहे, विजयी होत आहे आणि वाहव्वाही मिळवत आहे. हा काय चमत्कार आहे, याचा सखोल विचार करण्याची संधी राव साहेबांच्या लाल किल्ल्यासमोरील शेखीने आणि मधु लिमयेंच्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मिळाली आहे.

काँग्रेसची सत्तेवर मजबूत पकड राहिली आहे हे खरे, पण याचा अर्थ निवडणुकीत काँग्रेसला फार प्रचंड प्रमाणावर मते मिळतात, असे नाही. आजपर्यंतच्या सगळ्या निवडणुकांत निम्म्याच्या वर मते मिळाली असे एकदाच घडले. १९८४ साली राजीव गांधी ५१-५२ टक्के मते मिळवून जवळजवळ तीन चतुर्थांश जागा जिंकून गेले. विरोधकांची एकजूट झाली तर काँग्रेसला जिंकणे कठीण जाते हे सर्वमान्य आहे. निवडणुकींच्या निकालांचा अंदाज घेणारे संख्याशास्त्रज्ञ विरोधी पक्षांच्या ऐक्याला निर्देशांक काढतात. अशा तऱ्हेने केलेले अंदाज खूपसे बरोबर ठरतात असा अनुभव आहे. अनेक पक्ष असणारा भारत काही एकमेव देश नाही. फ्रान्ससारख्या देशातही अनेक पक्ष आहेत, पण तेथे एका पक्षाची सत्तेवर अशी पकड दिसत नाही. याचे एक साधे तांत्रिक कारण लक्षात घेणे आवश्यक आहे. आपल्याकडे कोणत्याही मतदारसंघात सर्वांत जास्त मते मिळवणारा उमेदवार विजयी घोषित होतो, त्याला मिळालेल्या मतांची संख्या किती का कमी असेना इतर कोणत्याही उमेदवारापेक्षा जास्त मते मिळाली की तो निवडून आला. मतदार संघातील बहुसंख्य लोकांनी ज्याला मत दिलेले नाही असाच उमेदवार बहुसंख्य ठिकाणी निवडून येतो आणि कायदे मंडळात जाऊन बसतो. भारतातील निवडणुकीचा तराजू दीड दांडीचा आहे. तीसपस्तीस लोकांचा एक गट पक्का असला की तो मतांचे नाही तरी जागांचे वारेमाप पीक घेतो. या उलट त्याच्या खालोखालच्या लहान गटाच्या तोंडाला अगदीच पाने पुसली जाण्याची शक्यता असते.

यावर उपाय म्हणून फ्रान्समध्ये उमेदवारास निम्म्याहून अधिक मते मिळाल्याखेरीज विजयी म्हणून घोषित केली जात नाही. कोणाही उमेदवाराला अशी मते मिळाली नाही तर आठ दिवसांच्या अंतराने पुन्हा मतदान होते. त्यांत दोनच उमेदवार उरतात आणि कोणी तरी एक अर्ध्यापेक्षा जास्त मते मिळवतो तेव्हांच विजयी घोषित होतो. जर्मनीमध्ये पद्धत थोडी वेगळी आहे. तेथील मतदार कोणा उमेदवार व्यक्तीला मत टाकतच नाही. मते पक्षाला किंवा पॅनेलला दिली जातात. पक्षाला मते ज्या प्रमाणात मिळतील नेमक्या त्याच प्रमाणात त्यांना जागा दिल्या जातात. पक्षाच्या यादीतील तितके उमेदवार निवडले जातात. भारतातील निवडणुकींची पद्धत इंग्लंडमधील पद्धतीवरून उचलली गेली आहे. या पद्धतीत दोष आहेत हे घटनाकारांना चांगले ठाऊक होते, तरीदेखील जाणीवपूर्वक अल्पसंख्येतील सर्वात मोठ्या गटाला फायदा मिळावा आणि सरकार स्थिर रहावे अशा बुद्धीने जाणूनबुजून एक अशास्त्रीय, अन्यायकारक, दीड दांडीच्या तराजूची पद्धत आपल्याकडे लागू करण्यात आली. ही पद्धत हिंदुस्थानात नसती तर काँग्रेस हरली असती, असे नाही. काँग्रेस उमेदवार इतर कोणत्याही पक्षापेक्षा जास्त जागा घेऊन निवडून आले असते, पण त्यांना इतर पक्षांशी समझोता करून आघाडीचे सरकार स्थापावे लागले असते. मनमानीचे एकपक्षीय, एकतंत्री आणि एक व्यक्तिमहात्म्याचे सरकार शक्य झाले नसते. भारतातील निवडणुकीची अशास्त्रीय पद्धत काँग्रेसच्या पथ्यावर पडली आहे, हे निःसंशय.

पण, अशा तांत्रिक युक्तिवादाने काँग्रेसची सत्तेवरील पकड पूर्णपणे समजत नाही. काँग्रेस जिंकते म्हणजे नेमके कोण जिंकते? महाराष्ट्रात सहकारी चळवळीतून पुढे झालेले धनदांडगे, शहरातील बांधकाम व्यावसायिक, लायसेंस-परमिट राज्यात चोरीमारी, तस्करी करणारे, हातभट्टी चालवणारे, सरकारी योजनांचा लाभ लाटणारे अशा अनेकांची युती काँग्रेसच्या झेंड्याखाली झाली आहे. पण हे विधानही तसे सगळ्या महाराष्ट्राला लागू नाही. प्रत्येक जिल्ह्यात काँग्रेसवर ताबा असणाऱ्या गटाचे स्वरूप एकसारखे आहे, असे मुळीच नाही. मुंबईतील काँग्रेसवाला वेगळा, चंद्रपूरमधील वेगळा, रत्नागिरी जिल्ह्यातील त्याहूनही वेगळा. केरळ राज्यात काँग्रेस मुसलमानांना जी आश्वासने देते त्याच्या नेमकी उलटी ईशान्येतील राज्यांत देते. काँग्रेस शहरांत वेगळी, गावांत वेगळी. काँग्रेसचा रंग काय? पाण्याचा रंग काय? ज्यात मिळवाल तो पाण्याचा रंग. विचार नसणे, दिशा नसणे आणि परिस्थितीप्रमाणे सत्ता काबीज करण्यासाठी आणि टिकविण्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी असणे हे काँग्रेसचे मोठे सामर्थ्य आहे.

दक्षिण महाराष्ट्रात सहकारी संस्था काँग्रेसला आर्थिक ताकद पुरवतात. मध्य प्रदेश, बिहारच्या मागास भागात सरकारी कंत्राटदार काँग्रेसचे मोठे समर्थक आहेत. मुंबईत कारखानदार काँग्रेसला खूष ठेवू पाहतात, गुजराथेत व्यापारी तर हरियानामध्ये जाट शेतकरी. पण असा एकही प्रदेश नाही की जेथे काँग्रेसच्या मागे आर्थिक प्रबळ सामर्थ्य नाही. या उलट, विरोधी पक्ष निवडणुकीपुरते निधी जेमतेम जमा करतात, पण काही कायमस्वरूपी आर्थिक संस्था विरोधकांच्या मागे असल्याचे उदाहरण कोठेच नाही.

काँग्रेसवाले एकमेकांना सांभाळून घेतात. एकमेकांत शंभर आणि पाच, पण दुसऱ्याशी विरोध करण्याचा प्रसंग आला तर मात्र एकशे पाच अशी एकी व्यवहारचतुर माणसांत सापडते. काही पदरी पाडून घेण्याकरिता निघालेली माणसे असा समजूतदारपणा दाखवतात. गाडगीळ, शंकरराव चव्हाण शरद पवारांवर काय वाटेल ते तोंड सोडोत आणि शरद पवार खाजगीत नरसिंहराव यांच्याविरूद्ध काहीही बोलोत; पण शेवटी आपल्या बरोबर सगळा पक्ष

खाली नेण्याची चरणसिंगी आणि देवीलाली खेळी ते कधीच खेळत नाहीत. या उलट, विरोधकांचे आहे. त्यांचे एकमेकांत फाटले की काँग्रेसपेक्षा आपला जुना साथीदार त्यांना अधिक भयानक शत्रू वाटू लागतो. कम्युनिस्ट आणि मार्क्सवादी यांत वितंड माजले तर कलकत्त्यातील रस्त्यांत त्यांनी एकमेकांचे जितके रक्ताचे पाट वाहवले तितके साऱ्या नक्षलवादी चळवळीत वर्गशत्रूंचेसुद्धा वाहवले नाहीत. जनता दलाच्या काळात सुब्रह्मण्यम् स्वामी व्ही. पी. सिंगांवर मोठे नाराज झाले. माझ्या समक्ष ते म्हणाले होते, काँग्रेस शत्रू खरा, राजीव गांधीला सत्तेवर पुन्हा येऊ देता कामा नये हे खरे पण पहिल्यांदा विश्वनाथ प्रताप सिंगांना संपवले पाहिजे. इतका सुशिक्षित, सुसंस्कृत माणूस पण अतिअभद्र शब्दांचा वापर करीत त्यांनी जाहिर केले, विश्वनाथ प्रताप सिंगांना संपवल्याखेरीज माझ्या आत्म्याला समाधान वाटणार नाही. विरोधकांना काँग्रेस विरोधांपेक्षा आपापसांतील विरोध अधिक भयानक वाटतात. या उलट, काँग्रेसवाले मात्र सत्तेबाहेर राहण्यापेक्षा अगदी किरकोळ जागीपण सत्तेशी जोडून रहावे अशा चातुर्याचे. काँग्रेसच्या ताकदीचे हे एक रहस्य आहे.

काँग्रेसची तुलना हिंदू धर्माशी करता येईल. हिंदू धर्माची व्याख्या कोण करू शकेल. नरबळी देणारेही हिंदू आणि कोणाही प्राणीमात्राच्या हिंसेच्या केवळ कल्पनेने कसाविस होणारेही हिंदू. हिंदू धर्माने माणसाला जितके नीच केले त्यावर अन्याय केले तितके दुसऱ्या कोणत्याच संस्थेने केले नसते. हिंदू धर्मीयांच्या इतिहासात जागोजागी पराभव झाला आणि तरीही आज 'महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती' तसा हिंदू धर्मही टिकून आहे. काँग्रेसही टिकून आहे.

या सर्वाहूनही काँग्रेसची ताकद ऐतिहासिक वडीलकीत आहे; इंग्रज आल्यानंतर स्थापन झालेला पहिला पक्ष. त्यानंतर काही थोडेथोडके पक्ष तयार झाले काय? पण जहालवादी लोकमान्य टिळक काँग्रेसमध्ये जाऊन सूरतच्या अधिवेशनात दंगल पहायला तयार झाले पण त्यांनी स्वतंत्र पक्ष काढला नाही. महात्मा गांधी दक्षिण अफ्रिकेतून आले त्यांनीही काँग्रेसचाच आधार घेतला. बूटपाटलोणवाल्या काँग्रेसला पंचा नेसणाऱ्या महात्म्याने नखशिखांत बदलून टाकले. या इतिहासामुळे काँग्रेसचे नाव देशाच्या कानाकोपऱ्यात आहे. बहुसंख्य निरक्षर लोक, वाहतुकीची साधने दुर्मिळ, संचार-व्यवस्था कठीण अशा देशात दुसरा कोणता पक्ष निघाला तर त्याचं नाव सर्व देशभर पसरण्याच्या आधी निवडणुकीत त्याचा निःपात होऊन निकालसुद्धां लागून जातो. देशाचा प्रचंड विस्तार, लोकांची निरक्षरता आणि आर्थिक दारिद्र्य यांमुळे तुकडे-तुकडे झालेल्या देशात केवळ ऐतिहासिक वडीलकीच्या आधारावर काँग्रेस बाजी मारून जाते.

काँग्रेसची स्थिती भारतीय गायीसारखी आहे. दुधाच्या कामी नाही, शेणाच्या कामी नाही पण दुष्काळ पडला तरी टिकून राहते, मरत नाही. आणि धन्याला कधी अपरंपार श्रीमंतही करत नाही, तरीही ती ज्या कारणाने पूज्य ठरते त्याच कारणाने काँग्रेसही लोकमान्य ठरते.

तुकडे तुकडे झालेला हा देश पुन्हा एकसंध होईल, आधुनिक तंत्रज्ञानाच्या आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाऱ्याच्या संपर्काने लोक अगतिकता सोडून देतील त्यावेळी कदाचित दुसरा कोणी पक्ष काँग्रेसशी तुल्यबळ पकड सत्तेवर मिळवू शकेल. तोपर्यंत सर्व देशभर सर्वकष सत्ता कोणी विरोधी पक्ष मिळवू शकेल अशी चिन्हे आज तरी नाहीत.

पंतप्रधान नरसिंह रावांची आणि शरद पवारांची काँग्रेसबद्दलची बढाई वास्तवाला सोडून नाही. त्यांत काँग्रेसवाल्यांना कदाचित अभिमानही वाटेल, सगळ्या देशाच्या दृष्टीने काँग्रेसला पर्याय नसणे ही मोठी दुर्दैवी घटना आहे.

● ● ●

# शरद जोशींचा बँकेविरूद्ध नुकसानभरपाईचा दावा

११ मे १९९४ राष्ट्रीयीकृत बँकांच्या कर्मचाऱ्यांनी संप केल्यामुळे बँकेचा कामकाजाचा दिवस असतांनाही बँक ग्राहकांना बँक सेवा, उपलब्ध झाली नाही. स्वतः शरद जोशी बँक ऑफ इंडियाच्या चाकण शाखेमध्ये त्यांच्या बचत खात्यातून रु. १०,०००/- काढण्यासाठी गेले असता कर्मचारी हजर नसल्याने, खात्यात पुरेशी शिल्लक असूनही आपण रक्कम देऊ शकत नसल्याचे शाखाप्रमुखांनी लिहून दिले.

या प्रकरणी श्री. शरद जोशींनी बँक ऑफ इंडिया चाकण शाखा, बँक ऑफ इंडिया विभाग व्यवस्थापकीय कार्यालय आणि बँक ऑफ इंडिया मुख्य कार्यालय यांच्या विरूद्ध पुणे जिल्हा ग्राहक मंचाकडे तक्रार नोंदविली असून एक लाख रुपयांच्या नुकासान भरपाईची मागणी केली आहे. ही तक्रार दाखल करतांना त्यांनी म्हटले आहे की कर्मचाऱ्यांची गैरहजेरी, मग ती संपामुळे असो की अन्य कारणाने, बँकेची अंतर्गत बाब आहे. या गैरहजेरीची पूर्वसूचना असतांनाही बँकेच्या व्यवस्थापकाने बँक ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी काही पर्यायी व्यवस्था उभी केली नाही हा बँक व्यवस्थापनाचा दोष आहे. त्याची झळ ग्राहकांना लागली. यामुळे ग्राहकांच्या झालेल्या दृश्यअदृश्य नुकसानीची जबाबदारी सर्वस्वी बँकव्यवस्थापनावर आहे.

या प्रकरणी योग्य तो न्याय करून भविष्यात बँक ऑफ इंडिया तसेच इतर बँकांकडूनही खातेदार ग्राहकांची कोंडी होणार नाही अशा प्रकारे उपाययोजना करणारे आवश्यक आणि उचित असे आदेश ग्राहक मंचाने द्यावे अशीही विनंती शरद जोशींनी या अर्जात केली आहे.

●

# भ्रष्टाचारविरोधी आंदोलन

## शेतकरी संघटनेचे १ जुलैचे रास्ता रोको

मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त गो. रा. खैरनार यांचेवरील निलंबन कारवाईचे निषेधार्थ शेतकरी संघटनेने पुकारलेल्या दि. १ जुलै ९४ च्या १ तासाच्या रास्ता रोको आंदोलनास राज्यात व्यापक प्रतिसाद मिळाल्याचे वृत्त अजूनही हाती येत आहे. महाराष्ट्रभर हजारो ठिकाणी हे आंदोलन छेडण्यात आले.

**कोल्हापूर –** सांगली मार्गावरील हेर्ले येथे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते सर्वश्री बापुसाहेब चौगुले, अजित नरदे, बाबुराव मगदूम, आदम मुजावर, भगवान काटे, बाबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन छेडले. या एक तासाचे रास्ता आंदोलनामुळे कोल्हापूर-सांगली महामार्गावरील वाहतूक संपूर्णतः विस्कळीत झाली होती. तर कोल्हापूर जिल्ह्यात ठिकठिकाणी हे आंदोलन छेडण्यात आल्याने वाहतुकीवर बराच परिणाम जाणवल्याचे सूत्रांनी सांगितले.

**परभणी**

परभणी जिल्ह्यात ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन छेडण्यात आले असून वसमत तालुक्यातील गुंडा पाटी येथील रास्ता रोको आंदोलन वाखाणण्याजोगे होते.

शेतकरी संघटनेची अल्प अवधीची सूचना केवळ वृत्तपत्रातून वाचून येथे आंदोलनासाठी सुमारे ५०० शेतकरी उपस्थित होते. श्री. पुरुषोत्तम लाहोटी तथा रामकिशन रुद्राक्ष यांनी यावेळी आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली. पोलिसांनी सर्व आंदोलकांना अटक करून नंतर त्यांची सुटका केली.

**अमरावती जिल्ह्यातील परसापूर उल्लेखनीय**

अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ, कळमजा, निंभी शिराळा, वाठोडा शुक्लेश्वर, लोणी येथील रास्ता रोको आंदोलनाबरोबरच अचलपूर तालुक्यातील परसापूर येथे छेडण्यात आलेले रास्ता रोको आंदोलन उल्लेखनीय होते.

शेतकरी संघटनेचे अचलपूर तालुका प्रमुख श्री. सुभाष उभाड व सर्वश्री देविदास पाटील, जनार्दन पाटील, पांडुरंग लहाने, दिगांबर हरणे, दिलीप पारवे, मनोहर तट्टे या प्रमुख कार्यकर्त्यांसह सुमारे २०० शेतकरी स्त्री-पुरुषांनी येथे रास्ता रोको आंदोलन छेडून अंजनगाव-अचलपूर मार्गावरील वाहतूक बंद पाडली. यावेळी मार्गाच्या दुतर्फा शेकडो वाहने उभी होती.

नागपूर जिल्ह्यातून रास्ता रोको आंदोलनाची ठिकठिकाणची जी माहिती हाती आली त्याचे वृत्त खालीलप्रमाणे आहे.

**काटोल**

काटोल येथील एस्.टी. स्टँडसमोरील मुख्य रस्त्यावर शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते दु. १२ वाजता रस्त्यावर बसून त्यांनी रस्ता अडवला. दु. १२ ते १ वाजेपर्यंत एकही बस व इतर वाहने कार्यकर्त्यांनी जाऊ दिली नाहीत. शांततेने रस्त्यावर बसून निषेध नोंदविणाऱ्या कार्यकर्त्यांना शेवटी जबरदस्तीने गाडीत बसून अटक केली व नंतर लगेच सोडून दिले. रास्ता रोको आंदोलन १०० टक्के यशस्वी झाले. श्री. राम नेवले, श्री. रमेश जोगेकर, ॲड. राजेंद्र बंदे, श्री. मनोहरराव ढोबळे या प्रमुख कार्यकर्त्यांसह श्री. अरुण कावळे, लेखचंद ढोकणे, अरविंद आटोणे, भाऊराव मनकवडे, रंजन ठाकूर, चंद्रशेखर पडोलीया, मोतीलाल नौकरीया, भारत राऊत, रमेश मुडलिया, दिपक झूनझूरकर, मधुकर धारोकर आदी १५० च्या वर कार्यकर्त्यांनी आंदोलनात भाग घेतला. पोलिसांनी सर्वांना अटक करून नंतर सोडून दिली.

**नरखेड**

नरखेड येथील पं. स. समितीजवळील बस स्टँडवर शेतकरी संघटनेच्या २०० च्यावर कार्यकर्त्यांनी दु. १२ ते १ वाजेपर्यंत रस्ता अडवून आंदोलन यशस्वी केले. शेतकरी संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते श्री. मदन कामडे, श्री. मनोहरराव बोडखे, श्री. नारायणराव बांदरे, उदयबाबू बोडखे, शोभारामसिंह चव्हाण, रामदास नासरे, राजेंद्र नासरे, कन्हैयालाल सूर्यवंशी, ओंकारसिंह सूर्यवंशी, ओमप्रकाश खोजरे, प्रविण बाळपांडे, आदी २०० च्या वर कार्यकर्त्यांना आंदोलनात भाग घेतला. पोलिसांनी कलम ६८ प्रमाणे सर्वांना अटक करून नंतर सोडून दिले.

**भारसिंगी**

भारसिंगी या चौरस्त्यावरसुद्धा मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते एकत्र येऊन १२ ते १ वाजेपर्यंत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

**कळमेश्वर**

कळमेश्वर येथील ब्राह्मणी फाट्यावर दु. १२ ते १ वाजेपर्यंत रास्ता रोकून आंदोलन यशस्वी केले. पोलिसांनी सर्व कार्यकर्त्यांना अटक करून सेडून दिले. प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये तालुका प्रमुख श्री. प्रा. नंदकुमार कऊटकर, श्री. लक्ष्मणराव ताजणे, अशोक गोतमारे यांच्यासह १०० कार्यकर्त्यांनी आंदोलनात भाग घेतला.

**भिवापूर**

भिवापूर तालुक्यातील गोंडबोरी या बसस्टॉपवर शेतकरी संघटनेच्या २०० च्यावर कार्यकर्त्यांनी दु. १२ ते १ वाजेपर्यंत रस्त्यावर बसून चक्का जाम आंदोलन केले. श्री. केशवराव गोडे, प्रभाकर माळवे, कुशाबराव राऊत, भाऊराव गहूकर, सौ. यमुताई राऊतसह प्रमुख कार्यकर्त्यांनी आंदोलन यशस्वी केले.

सावनेर, बुट्टीबोरी, महादूला व इतर काही ठिकाणीसुद्धा आंदोलन झाले.

**माणिकवाडा (जि. यवतमाळ)**

केवळ वर्तमानपत्रातील बातमीवरून कळलेल्या शेतकरी संघटनेच्या आदेशावरून यवतमाळ जिल्ह्याच्या नेर तालुक्यातील माणिकवाडा येथे शेतकरी संघटनेच्या स्त्रीपुरुष पाईकांनी मुलाबाळांसह रस्त्यावर बसून १ जुलै १९९४ रोजी दुपारी १२ ते १ या काळात रास्ता रोको करून खैरनारांना निलंबित करण्याच्या, प्रशासनाच्या भ्रष्टाचाराला पाठिशी घालण्याच्या कृतीचा निषेध केला. पेरणीचा हंगाम असतांनासुद्धा

**(पान ६ वर)**

# कार्यकर्त्यांनी घेतलेल्या उलटतपासणीमुळे कर्जवसुली अधिकारी तोंड काळे करून पळाले

कर्जवसुलीसाठी जमिनीचा लिलाव करण्यासाठी आलेल्या बँक अधिकाऱ्यांना शेतकरी संघटनेच्या "त्या" आंदोलनाची माहिती फक्त जाहिररित्या देण्यात आल्याने या अधिकाऱ्यांना लिलाव-कार्यक्रम गुंडाळून गावाबाहेर पळ काढावा लागल्याची घटना नगर जिल्ह्याच्या राहुरी तालुक्यातील कणगर येथे घडली.

कणगर येथील सात शेतकऱ्यांकडील थकित कर्जाच्या वसुलीसाठी भू-विकास बँकेने या शेतकऱ्यांच्या शेतजमिनीच्या लिलावाचा कार्यक्रम घोषित केला होता. त्याप्रमाणे ३१ मे ९४ रोजी दुपारी १ वाजता भू-विकास बँकेचे अधिकारी सर्वश्री एच. एन. बुऱ्हाडे, डी. पी. शिंदे, एम. टी. शिंदे, एस. टी. कुलमुडे हे गावात दाखल झाले. ग्रामस्थांनी व येथील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे आस्थेवाईकपणे स्वागत करून शेतजमिनीचा लिलाव न करण्याचे आवाहन केले. काही हौशी कार्यकर्त्यांनी त्यांना "तोंडाला काळे फासण्याच्या" आंदोलनाची जाहिररित्या माहिती दिली.

तरी मात्र 'वसुली झाली नाही तर बँक कशी चालणार?' असा युक्तिवाद बँक अधिकाऱ्यांनी केला. अन्य क्षेत्रातील वसुली कर्ज रक्कम ५ हजार कोटी रुपये आहे आणि त्यातच हर्षद मेहताने बँकांचे हजारो कोटी रुपये बुडविले असतांनादेखील बँका बंद झाल्या नाहीत तर शेतकऱ्यांकडील कर्ज केवळ १५०० कोटी रुपये असतांना बँका बंद कशा होतील असा प्रतिटोला हाणून बँक अधिकाऱ्यांचा युक्तिवाद एका कार्यकर्त्यांने खोडून काढल्यामुळे अधिकाऱ्यांची चांगलीच पंचाईत झाली. मग मात्र या अधिकाऱ्यांनी कसल्याही युक्तिवादाच्या भानगडीत न पडता चूपचाप गावातून पळ काढला.

कणगर गावच्या या कणखर कृतीत सर्वश्री. अरुण धोंडे, अशोक कड, सुभेदारभाई शेख, जगन्नाथ घाडगे, बाबुराव निमसे, मच्छिंद्र वरघुडे, अण्णासाहेब दिवे, सुदामराव सरोदे, पुंडलिक वरघुडे, सुधाकर कराळे या कार्यकर्त्यांचा समावेश होता.

प्रेषक : **श्री. सुधाकर कराळे,** देवळाली प्रवरा.

---

# अजब तुझे सरकार

'मुंबईमधील बॉंबस्फोट प्रकरणातील प्रमुख आरोपी दाऊद इब्राहिम याची मालमत्ता (बेनामी, नामी, संबंधी इ. इ.) जप्त करण्याच्या परवानगीसाठी केंद्रीय गुप्तचर खात्याचा न्यायालयात अर्ज' - एक बातमी.

'दाऊदच्या मालमत्तेसंबंधी ठोस पुरावे सादर करावेत - केंद्रीय गुप्तचर खात्याला न्यायालयाचे आदेश'- आणखी एक बातमी.

हजार गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एखाद्या निरपराध्यास शिक्षा होता कामा नये इतकी काळजी घेणाऱ्या कायद्याच्या या राज्यात मात्र -

सरकारच्या लूटमारीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या नावे लागलेली थकबाकी वसूल करण्याच्या मिषाने त्यांच्या घरची भांडीकुंडी गोळा करून न्यायला, तसे करायला आलेल्या लुटारू सरकारच्या नोकरांना मज्जाव करून आपल्या झोपडीचे संरक्षण करू धजणाऱ्या शेतकऱ्याला बेड्या घालायला, प्रसंगी मारहाण करायला कोण्या न्यायालयाची परवानगी लागत नाही, आणि कोणते न्यायालय पुरावा सादर करण्याची अपेक्षाही बाळगत नाही.

---

**(पान ५ वरून)**

या आंदोलनात लोकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. या आंदोलनाचे नेतृत्व शेतकरी संघटनेचे कायकर्ते श्री. बबनराव चौधरी यांनी केले.

**लोहगाव फाटा, (जि. परभणी)**

हिंगोली तालुक्यातील लोहगाव फाटा येथे १ जुलै रोजी भ्रष्टाचार विरोधात १ तासाचे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात सर्वश्री रामकृष्ण देशपांडे, सदबाराव होडबे, परबतराव माने, खंडबाराव पोले, नारायण सावंत इत्यादी प्रमुख कार्यकर्त्यांसमवेत सुमारे पन्नास शेतकऱ्यांनी भाग घेतला.

**रांजणखार (जि. रायगड)**

अलिबाग तालुक्यातील रांजणखार येथे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते रवि पाटील यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील शेतकरी स्त्रीपुरुषांनी १ जुलै रोजी १ तासाचे रास्ता रोको आंदोलन करून, भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्याचा सरकारच्या कृतीचा निषेध केला. पोलिसांनी सुमारे शंभर आंदोलनकर्त्यांना अटक करून नंतर सोडून दिले.

(संकलन : **प्रमोद लाजूरकर,** अकोला)

# किसान समन्वय समिती बैठक, सेवाग्राम, वर्धा.

## ९-१० जुलै १९९४

# ठराव

देश की किसान संगठनों की किसान समन्वय समिति की बैठक सेवाग्राम (वर्धा) के यात्री निवास में ९-१० जुलाई १९९४ को हुई ।

इस बैठक में पंजाब, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश (बुंदेलखंड), उत्तर प्रदेश (पश्चिम) और महाराष्ट्र की किसान संगठनों के प्रतिनिधी उपस्थित थे । हरियाणा में भारतीय किसान यूनियन का 'जेल भरो' आंदोलन चल रहा है इस कारण वहाँ के प्रतिनिधी उपस्थित न रह सके ।

इस बैठक में निम्न प्रस्ताव पारित हुए ।

**(१) राजकीय पर्याय**

किसान समन्वय समिति ने देश के राजकीय स्थिती का विस्तार से जायजा लिया । प्रमुखतः, स्वतंत्रता में विश्वास रखनेवाले नागरिकों के सामने चुनने लायक पर्याय कोई बचा नहीं इसपर गहरी चिंता प्रकट करते हुए किसान समन्वय समिति ने हर व्यक्ति की स्वतंत्रता की रक्षा के लिए अलग राजकीय पर्याय की आवश्यकता महसूस की और मुंबई में स्थापित 'स्वतंत्रता आंदोलन'ने इस तरह का पर्याय सामने लाने जो प्रयास शुरू किये हैं उसका स्वागत किया ।

यह प्रस्ताव करते समय किसान समन्वय समिति ने यह भी जाहिर किया कि यह समिति भविष्य में भी पहले की तरह देश के किसान आंदोलन की ही संस्था रहेगी, वह राजकीय पार्टी में नहीं बदलेगी ।

**(२) समाजवाद का विरोध**

सारी दुनिया में समाजवादी व्यवस्थाओं का अंत होता जा रहा है, खुली व्यवस्थाएँ उभर आ रही है । इंडिया सरकार भी खुली व्यवस्था का स्वीकार करने का दावा करती है फिर भी साथ साथ खुली व्यवस्था से विसंगत समाजवाद का भी पुरस्कार जारी रखती है इस की किसान समन्वय समिति ने आलोचना की ।

Peoples Representative Act, 1951 के सेक्शन 29 A के उप-परिच्छेद (५) मे लिखा है,

that the association or body shall bear true faith and allegiance to the Constitation of India as by law established and to the principles of socialism, secularisum and democracy....

समाजवाद का अंत होते हुए भी समाजवाद का अस्वीकार कर कोई भी व्यक्ति चुनाव लढ नहीं सकता । खुली व्यवस्था में माननेवाली यह किसान समन्वय समिति प्रस्ताव करती है कि न चाहते हुए भी समाजवाद का स्वीकार आवश्यक करनेवाली, मूल संविधान में बाद में समाविष्ट की गयी संविधान की सभी धाराएँ रद्द करें इसलिए व्यापक आंदोलन खडा किया जाएगा ।

**(३) भ्रष्टाचार विरोधी आंदोलन**

नेहरूवादी व्यवस्था से उभरे भ्रष्टाचार का फायदा लेनेवाले सभी – नौकरशाह, नेतागण गुंड इत्यादि – वही व्यवस्था जारी रहे इसलिए कोशिश कर रहे हैं, जनसामान्यों को स्वतंत्रता का मौका देनेवाली खुली व्यवस्था का विरोध कर रहे है । यह ध्यान में ले कर किसान समन्वय समिति ने आज देश में भ्रष्टाचार के विरोध में जो आंदोलन उभर रहे हैं उनका स्वागत किया और उन आंदोलनों को और व्यापक तथा उग्र करने अपना कार्यक्रम बनाने का प्रस्ताव किया ।

**(४) समन्वय पत्रिका**

सारे देश में चले किसान आंदोलन की जानकारी सभी राज्यों की किसान संगठनों को हो तथा सभी किसान संगठनों में वैचारिक समन्वय रहे इसलिए किसी नियतकालिक पत्रिका की आवश्यकता है । प्रायोगिक रूप में 'शेतकरी संघटक' का अंग्रेजी और हिंदी द्वैभाषिक संस्करण शुरू किया जाए और शुरू में हर राज्य में कम से कम ५० कापियाँ भेजी जाएँ यह प्रस्ताव किसान समन्वय समिति के सामने रखा गया । इस प्रस्ताव का प्रायोगिक अंमल करने की जिम्मेदारी महाराष्ट्र की 'शेतकरी संघटना' को सोंप दी गयी ।

**प्रशिक्षण**

बदलती हुई परिस्थिती में किसान आंदोलन की कार्यपद्धती तथा विचारों मे विविधता और गहराई बढना अनिवार्य है । इस विविधता और गहराई को अच्छी तरह जान कर किसान आंदोलन का पैगाम किसानों तक पहुँचानेवाले कार्यकर्ताओं का प्रशिक्षण होने की जरूरत किसान समन्वय समिति ने महसूस की । किसान समन्वय समिति की अगली बैठक में इस तरह के प्रशिक्षण कर पाठ्यक्रम बनाना तय किया गया ।

(६) किसान समन्वय समिति की अगली बैठक ४, ५, ६ सितंबर १९९४ को आंबेठाण में होगी और उसमें देशव्यापी किसान आंदोलन का अगला कार्यक्रम तय किया जाएगा ।

**बिपीन देसाई**

अध्यक्ष, किसान समन्वय समिति

# म. रा. शासनाचे महिला धोरण

महाराष्ट्र शासनाने गेल्या महिन्यात घोषित केलेल्या महिला धोरणाचा सांगोपांग अभ्यास करण्यासाठी शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीची पहिली बैठक वर्धा येथे १० जुलै १९९४ रोजी होऊन या महिला धोरणातील वेगवेगळे विषय वेगवेगळ्या कार्यकर्त्यांवर अभ्यासाठी सोपविण्यात आले आहेत. शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकर्त्या या धोरणाचा अभ्यास चांदवडची शिदोरी, चांदवड महिला अधिवेशनाचे ठराव, जाहिरनामा, अमरावतीची आयुधे, अमरावती महिला अधिवेशनाचे ठराव यांच्या अनुषंगाने करणार असून लवकरच त्याचा अहवाल सादर करतील. ●

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On August 8, 1994

To

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
August 6, 1994

PNCW 281
Licence to post without prepayment No. 87

# सहावे अधिवेशन

## नागपूर, दि. १० ते १२ नोव्हेंबर १९९४

★ नागपूर जिल्ह्यातील कार्यकर्ते तयारीस लागले.

★ २१ ऑगस्ट पासून जिल्ह्याजिल्ह्यांत प्रचाराची सुरुवात. या प्रचारात भाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी मुंबईत दि. १२ ऑगस्ट रोजी प्रशिक्षण शिबीर.

★ कार्यकर्त्यांनी प्रचार करून जागृत केलेल्या सर्व भागांत शेतकरी संघटनेच्या जेष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचारयात्रा काढण्यात येतील. या प्रचारयात्रांची सुरुवात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आजाद हिंद सेनेच्या ५० व्या वर्धापन दिनी म्हणजे २१ ऑक्टोबर १९९४ रोजी होईल व त्या ९ नोव्हेंबरपर्यंत चालून नागपूरमध्ये एकत्रित होतील.

★ अधिवेशन पूर्वतयारीचा कार्यक्रम लवकरच जाहिर करण्यात येईल.

**पाशा पटेल**
अध्यक्ष, शेतकरी संघटना.

## शेतकरी संघटनेचा पुणे संपर्क

शेतकरी संघटना व शेतकरी संघटक साठी टपालाद्वारे पुणे संपर्क पुन्हा सुरू करण्यात येत आहे. त्याचा पत्ता पुढीलप्रमाणे :–

**शेतकरी संघटना / शेतकरी संघटक**
**११८७/६६, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.**

या पत्त्यावर आलेले टपाल त्याच दिवशी आंबेठाण येथील मध्यवर्ती कार्यालयात पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याने टपाल मिळण्यातील वेळ एकदोन दिवसांनी कमी होईल. तरी सर्व कार्यकर्त्यांनी याची नोंद घेऊन शेतकरी संघटना, शेतकरी संघटक, शरद जोशी, सुरेशचंद्र म्हात्रे या नावे पाठवावयाचे टपाल वरील पत्त्यावर पाठविण्यास सुरुवात करावी. मात्र, मनी ऑर्डर्स, रजिस्टर पत्रे अशा प्रकारचे हिशोबाच्या दृष्टीने महत्त्वाचे टपाल परस्पर आंबेठाणच्याच पत्त्यावर पाठवावे.

शेतकरी संघटना,
मध्यवर्ती कार्यालय

## क्षमस्व!

काही अपरिहार्य कारणाने २१ जुलै १९९४ चा अंक प्रकाशित करू शकलो नाही याबद्दल क्षमा असावी. शेतकरी संघटकच्या वाचक, हितचिंतक इत्यादींच्या झालेल्या गैरसोयीबद्दल दिलगीर आहोत.

– संपादक

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी.-०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.